MAFCOCS
महाराष्ट्र को-ऑप.
क्रेडिट न्यूज
वर्ष १५ वे, जानेवारी २०१९

संपादकीय मंडळ
❖ अध्यक्ष ❖
ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे
❖ संपादक ❖
विनोद कुलकर्णी
❖ कार्यकारी संपादक ❖
लक्ष्मणराव पाटील
❖ उपसंपादक ❖
सौ. अंजली गोपाळ पाटील
❖ सदस्य ❖
डॉ. शांतीलाल तेजमल सिंगी
अॅड. दीपक पटवर्धन
सौ. भारती राजेंद्र मुथ्था
सोमनाथ साळुबा गायकवाड
शरद रामचंद्र जाधव
❖ मुख्य कार्यकारी अधिकारी ❖
सौ. सुरेखा विजय लवांडे

ई-मेल : creditnews90@gmail.com
वेबसाईट : www.mafcocs.com
7888281251
संपादकीय कार्यालय
क्रेडीट न्यूज विभाग
सुरक्षा भवन, प्लॉट नं. ९, इंडस्ट्रियल इस्टेट,
गुलटेकडी, मुकुंदनगर, पुणे - ४११०३७,

अंतरंग

अध्यक्षीय मनोगत ५
संपादकीय.. ७
एन.पी.ए.चे प्रभावी नियोजन ९
चेअरमन ऑफ द मंथ.................................... १२
नामांकन (नॉमिनेशन) एक अत्यावश्यक सुविधा........ १६
तारणी कर्ज / स्थावर मालमत्तेचे गहाणखत २०

कृपया राज्य फेडरेशनचा खालील व्हॉटस् अॅप क्रमांक आपल्या माहिती व संपर्कासाठी
7888281251

प्रशासकीय कार्यालय
पत्रव्यवहार व संपर्क
सीटीसी क्र. ११९/बी, प्रमिला अपार्टमेंट,
तिसरा मजला, 'लकाकी' बंगलो शेजारी,
लकाकी रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
फोन : ०२०-२५६७३००८ / २५६७९००८
E-mail : mafcocs90@gmail.com

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'महाराष्ट्र को-ऑप. क्रेडिट न्यूज' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक सौ. सुरेखा विजय लवांडे यांनी श्री.जे. प्रिंटर्स प्रा.लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., सुरक्षा भवन, १ला मजला, प्लॉट नं. ९, इंडस्ट्रियल इस्टेट, मुकुंदनगर, पुणे येथे प्रसिद्ध केले.
संपादक - विनोद कुलकर्णी

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.

संचालक मंडळ

❖ **अध्यक्ष** ❖

श्री. ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे

❖ **कार्याध्यक्ष** ❖

श्री. राजुदास लक्ष्मणराव जाधव

❖ **उपकार्याध्यक्ष** ❖

श्री. सुदर्शन अंबादास भालेराव

❖ **महासचिव** ❖

डॉ. श्री. शांतीलाल तेजमल सिंगी

❖ **खजिनदार** ❖

श्री. दादाराव भाऊराव तुपकर

❖ **संचालक** ❖

श्री. वसंत नाथा शिंदे

श्री. प्रकाश गोपाळराव पोहरे

श्री. विनोद सुर्यनारायण कुलकर्णी

ॲड. सौ. अंजली गोपाळ पाटील

श्री. सुरेश गणपत पाटील

श्री. शशिकांत बापुसाहेब राजोबा

श्री. सोमनाथ साळुबा गायकवाड

श्री. संग्रामसिंग दिलीपराव पाटील

श्री. राधेश्याम देवकिसन चांडक

श्री. भास्कर कृष्णा कोठावदे

श्री. चंद्रकांत श्रीरंग वंजारी

सौ. भारती राजेंद्र मुथ्था

श्री. सागर जंबु चौगुले

श्री. गोविंद मुरलीधर अग्रवाल

श्री. लक्ष्मणराव मारूती पाटील

श्री. शिरीष शंकरराव पुरोहित

❖ **तज्ज्ञ संचालक** ❖

ॲड. श्री. दिपक मनोहर पटवर्धन

श्री. विजय नरसिंह देशमुख

❖ **मुख्य कार्यकारी अधिकारी** ❖

सौ. सुरेखा विजय लवांडे

ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे

अध्यक्षीय मनोगत

सहकारी बंधूनो !

हा अंक आपल्या हातात येईल तेव्हा नविन वर्ष सुरू झालेले असेल. नुतन वर्षाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

नविन वर्ष सुरू झाले आपल्या कामाची जबाबदारी वाढली आहे. कारण जानेवारी, फेब्रुवारी, मार्च हे महिने आपल्या पतसंस्थांसाठी खूप महत्त्वाचे आहेत. या काळात आपण जागरूक राहून संस्थांचे एन.पी.ए कसे कमी करता येईल. यासाठीचे धोरण अवलंबून ते प्रत्यक्षात आणावयास पाहिजे. सर्व अधिकारी, कर्मचारी वर्गाने या काळात अतिशय मेहनत घेवून आपल्या संस्थांचे कामकाज कसे चोख होईल याकडे अधिक लक्ष द्यावे.

पतसंस्था सक्षम करण्यासाठी एन.पी.ए.चे प्रमाण फार महत्त्वाचे आहे. यासाठी आपण सर्वांनी आपआपल्या संस्थामध्ये प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे.

प्रत्येक महिन्यात अनेक पतसंस्थांना भेटी देण्याचा योग येतो. त्याप्रमाणे अनेक पतसंस्थांना भेट देण्याचा योग आला. परंतु प्रामुख्याने दोन पतसंस्थांना भेटी दिल्या त्यांचा आर्वजुन उल्लेख करावसा वाटतो.

* सोलापूर जिल्ह्यातील चौंडेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या संस्थेत गेलो असताना, संस्थेमध्ये अतिशय चोख कामकाज, साधी माणसे, संचालकांचा आपआपसातील समन्वय, सर्वच कौतुकास्पद गेली ३० वर्षांपासून सोलापूरकरांच्या सेवेत विश्वासाने कार्यरत असलेली पतसंस्था.
* डॉ मणिभाई देसाई ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., पुणे या संस्थेस २५ वर्षे पूर्ण झाली. नुकताच रौप्य महोत्सव सांगता सोहळ्यास अध्यक्ष म्हणून उपस्थितीत होतो. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. शरदचंद्रजी पवारसाहेब, माजी केंद्रिय कृषीमंत्री, भारत सरकार होते. पवारसाहेब सहकार क्षेत्रातील जाणकार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने संधी मिळताच मी आपल्या पतसंस्थांबाबत टी.डी.एस., जी.एस.टी., इनकम टॅक्स बाबत आपल्या अडचणी मांडल्या. त्यांनीही यासाठी वेळ देण्याचे मान्य केले.

मला जेव्हा संधी मिळेल तेव्हा मी आपल्या पतसंस्था चळवळीची बाजू मांडतो. हा माझ्या सवयीचाच भाग झाला आहे. प्रयत्न करत राहणे आपले काम आहे, यश नक्की मिळेल मला असा माझा विश्वास आहे.

परंतु या दोन्ही पतसंस्थांचे समाजातील स्थान, विश्वासार्हता पाहून समाधान झाले. मित्रांनो आपल्या पतसंस्थांना समाजात विश्वासार्हता मिळविणे जेवढे कठीण नव्हते; तेवढे आताच्या परिस्थितीत विश्वासार्हता टिकविणे कठीण आहे. पण आमच्या पतसंस्था ते करीत आहेत आणि गेली २५ ते ३० वर्षे त्याहून अधिक काळ हा टिकविलेला विश्वास घेवून पतसंस्था लवकरच सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करतील. सभासदांचा अखंडीतपणे विश्वास टिकवून, प्रगती करणे अवघड आहे. पण आपण एकमेकांच्या सहकार्याने हे इंद्रधनुष्य पेलवत आहोत.

आपणा सर्वांना पुन:श्च नुतन वर्षाच्या शुभेच्छा !

वीराचार्य पतसंस्था

वीराचार्य बाबासाहेब कुचनुरे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सांगली

प्रधान कार्यालय : ३१७, महावीरनगर. सांगली. फोन नं. (0233) 2621771, 2628449 ई-मेल : veeracharyasangli@gmail.com

आपले बचतीचे समाधान... हेच आमचे बलस्थान..!

दि. ३१/०८/२०१८ ची सांपत्तिक स्थिती

- स्वनिधी २० कोटी
- ठेवी १३५ कोटी
- भाग भांडवल ५ कोटी ५ लाख
- खेळते भांडवल २२५ कोटी
- कर्जे १०२ कोटी
- गुंतवणुक ५८ कोटी
- नेट एन.पी.ए ०%

ठेवीवरील आकर्षक व्याजदर	
किमान ४६ दिवस ते १८० दिवस	७ %
१८१ दिवस ते १ वर्षापर्यंत	८ %
१ वर्ष ते २ वर्षापर्यंत	९ %
२ वर्ष व त्यापुढे	८.७५ %
दामदुप्पट ठेव ८ वर्षे ३ दिवस	
जेष्ठांना १ वर्षावरील ठेवीसाठी ०.५ % जादा व्याजदर	

किफायतशीर व्याजदराच्या अनेक कर्ज योजना	
रु. १ लाखा पर्यंत	: १४.०० %
रु. १ ते १० लाखा पर्यंत	: १३.५० %
रु. १० ते २५ लाखा पर्यंत	: १२.७५ %
रु. २५ लाख व त्यापुढे	: १२.५० %
बेदाणा, गोदाम रिसीट तारण	: १२.५० %
सोने तारण कर्ज	: ११.५० %

शितल मसुटगे – व्यवस्थापक

शशिकांत राजोबा सर – संचालक, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन

अरुण पाटील – व्हा. चेअरमन

आदगोंडा पाटील – चेअरमन

✻ संचालक मंडळ ✻

- डॉ.अजित पाटील
- अजितकुमार भंडे
- शाहू गुंडवाडे
- सौ. पुष्पा पाटील
- डॉ.सुरेंद्र ठिकणे
- अरुण कुदळे
- सुरेश चौगुले
- महावीर कुचनुरे
- मोहन नवले
- बाबासो। कर्नाळे
- जयकुमार बेले
- राजाराम हराळे
- प्रकाश सांगावे
- दादासो। पाटील
- श्रीमती आशालता मुळे
- प्रकाश पोतदार
- गुणधर टकुडगे
- मनोज भिलवडे
- सौ. उज्वला आडमुठे

✻ सहकारातून विनम्र सेवेची १९ शाखांची शृंखला ✻

सांगली : २६२८१५४	टाकळी : २२५८१४६	ढवळी : २२५४१२५	समडोळी : २४८२४२१	ब्रम्हनाळ : २३५१३१
कवलापूर : २३६४६२७	कुपवाड : २३४६९९१	कवठेएकंद : २६४०८४	माळवाडी : २४८६५९५	खंडेराजुरी : २२६८९२०
दुधगांव : २४८६१९०	नांद्रे : २४७३५५५	भोसे : २२५७१७१	मालगांव : २२६६२६६	बेडग : २२६१२३४
गावभाग सांगली : २३३३७७४	मिरज : २२२२५७१	आष्टा : ०२३४२ -२४२५४२	भिलवडी : ०२३४६ - २३७३००	

विनोद कुलकर्णी

संपादकीय

पतसंस्था चळवळीचा कृषी कर्जमाफी योजनेत समावेश होणे गरजेचे

भारत हा कृषिप्रधान देश आहे परंतु केंद्र आणि राज्य सरकारचे ध्येयधोरणांमध्ये कृषिला प्राधान्य म्हणावे असे नाही. संपूर्ण भारतातील जनतेचा पोशिंदा हा गेल्या काही वर्षापासून सातत्याने अडचणीत येत आहे. वाढते जाणारे औद्योगिकरण, नापिकी, दुष्काळ, पाणीटंचाई, योग्य वेळेत पतपुरवठा न होणे, हमीभाव न मिळणे त्यामुळे दिवसेंदिवस बळीराजा अडचणीत येत आहे. त्यातूनच कृषी कर्जमाफी सारखे तात्पुरते उपाय केले जात आहेत. परंतु त्याचीही अंमलबजावणी नीट होत नसल्याने समाजातील चक्र बिघडत आहे. महाराष्ट्राचा विचार करायचा झाला तर कृषीक्षेत्रासाठी पतसंस्था चळवळीने मदत करण्यात नेहमीच पुढाकार घेतला आहे. मागील केंद्र सरकारने कृषी कर्जमाफी केली तेव्हासुद्धा पतसंस्थांची कर्जमाफी झाली नव्हती. आतासुद्धा महाराष्ट्र सरकारने कर्जमाफी केली त्यातसुद्धा पतसंस्थांबरोबर काही नागरी सहकारी बँकांचा समावेश केलेला नाही त्यामुळे पतसंस्था आर्थिक अडचणीत आल्या आहेत.

महाराष्ट्रात सहकारी पतसंस्था चळवळ चांगलीच रुजली आहे. त्या माध्यमातून शेतकऱ्यांना वेळोवेळी कृषी कर्जही दिले जाते, परंतु विविध कारणांमुळे कर्ज थकित झाल्यास त्याचा भार पतसंस्थांना सोसावा लागतो. दुष्काळ, नापिकी आल्यास राज्य केंद्र सरकार कर्जमाफी देईल अशी आशा शेतकऱ्यांना असते, परंतु कर्जमाफी होताना राष्ट्रीयीकृत बँका आणि नागरी सहकारी बँकांची होते, पतसंस्थांची होत नाही. कर्जमाफी होईल म्हणून शेतकरी पतसंस्थांचे कर्ज भरत नाहीत. परिणामी पतसंस्था आणि शेतकरी दोघेही अडचणीत येत आहे. त्यामुळे आता पतसंस्थांमधील कृषी कर्जही माफ होणे गरजेचे आहे. अगोदरच नोटाबंदी, जी.एस.टी.मुळे पतसंस्था चळवळ अडचणींशी सामना करत आहे. त्यात कृषी कर्जाचा भार पडल्यास पतसंस्था चळवळ कोलमडण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथून पुढे पतसंस्थांचा कृषी कर्जमाफी योजनेत समावेश केला गेला पाहिजे.

नोव्हेंबर २०१८ अखेर राज्यातील ५० लाख शेतकऱ्यांना २१ हजार कोटी रुपयांची कृषी कर्जमाफी दिल्याचे आणि अजूनही ही प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले जाते, परंतु ही योजना लागू करताना राज्य सरकारने नागरी सहकारी पतसंस्थांबाबत दुजाभाव केला. त्यामुळे या पतसंस्था अडचणीत आहेत. आता लोकसभा निवडणुका जवळ आल्या आहेत. त्यात नुकत्याच झालेल्या पाच राज्यांच्या निवडणुकीत भाजपला सत्ता मिळालेली नाही त्यामुळे पुन्हा एकदा देशपातळीवर कृषी कर्जमार्फची चर्चा सुरू झाली आहे, पण ही कर्जमाफी होताना ज्या ज्या आर्थिक संस्थेतून शेतकऱ्याला कृषी कर्ज देण्यात आले आहे त्या सर्व आर्थिक संस्थांचा कर्जमाफी होताना समावेश केला गेला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने कृषी कर्ज माफी योजनेचा फायदा होईल आणि समाजातील सर्वच आर्थिक संस्थांची प्रकृती चांगली राहील अन्यथा हे चक्र कोलमडण्याची शक्यता आहे.

■■■

श्रमं एव जयते ।

कर्मवीर मल्टिस्टेट

कर्मवीर भाऊराव पाटील मल्टिस्टेट को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. जयसिंगपूर

राधाबाई रोड, ९ वी गल्ली, जयसिंगपूर ४१६१०१ जि. कोल्हापूर
फोन : (०२३२२) २२८३५३, २२८३५४ Email: karmaveerjsp@hotmail.com

महाराष्ट्र व कर्नाटकातील एक अग्रगण्य मल्टिस्टेट संस्था

सांपत्तिक स्थिती ३१.३.२०१८

सभासद संख्या	: १२५१४
वसुल भाग भांडवल	: ६ कोटी २४ लाख
निधी	: ३१ कोटी ८६ लाख
ठेवी	: ३७२ कोटी
येणे कर्ज	: २३० कोटी
गुंतवणूक	: १८१ कोटी
खेळते भांडवल	: ४२७ कोटी

आकर्षक व्याज दर

सेव्हिंग	४%
सुपर सेव्हिंग	६%
किमान ४६ दिवस	७.५%
१८१ दिवस मुदत ठेव	८%
१ वर्षे पुर्ण ते ५ वर्षापर्यंत मुदत ठेव (मासिक/ तिमाही व्याज घेण्याची सोय)	८.५%
स्पेशल मुदत ठेव ३६५ दिवस	९%
३ वर्ष पूर्ण ते ५ वर्षापर्यंत मुदत व पुर्नगुंतवणुक	८.५%
५ वर्ष पूर्ण ते ७ वर्षापर्यंत	८.७५%
कर्मवीर ठेव (दामदुप्पट)	८ वर्षे

१ वर्षे पूर्ण ते पुढे ज्येष्ठ नागरिकांना ०.५% वाढीव दर

CORE BANKING
SMS BANKING
MOBILE BANKING
RTGS / NEFT
AEPS

आम्ही राहतो 'अपडेट' कारण...
आम्ही जाणतो तुमच्या गरजा...

सौजन्यपूर्ण सेवेसाठी २७ शाखांची शृंखला...

श्रीधर चंदोबा — मॅनेजर
सागर चौगुले — व्हा. चेअरमन
भाऊसो सुर्यवंशी — चेअरमन

* संचालक मंडळ *

प्रा. डी. ए. पाटील, भरत गाट, भाऊसो पाटील, बाबासो हुपरे, आदिनाथ किणींगे, सौ.ज्योत्स्ना नांदणे, अरविंद मजलेकर, अनिल भोकरे, सौ.सुरेखा मलिकवाडे, भुपाल गिरमल, रमेश पाटील, राजाराम शिंदे, विजय आवटी, कुमार पाटील, पांडुरंग काळे, रावसो पाटील, सुकुमार पाटील, शिवाजी कोळी

एन.पी.ए.चे प्रभावी नियोजन

लक्ष्मणराव पाटील
कार्यकारी संपादक, संचालक,
महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था
फेडरेशन

सहकाऱ्यांनो नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

हा अंक आपल्या हातात पडेल त्यावेळेस आपल्या पतसंस्थांचे आर्थिक वर्ष संपायला तीन महिन्याचा कालावधी शिल्लक असेल, या तीन महिन्यांच्या कालावधीत आपण प्रभावीपणे एन.पी.ए.चे नियोजन केल्यास आपली संस्था अडचणीत येण्यापासून वाचू शकेल आणि हे प्रभावी नियोजन कसे करावे या संदर्भात मी या लेखात आपल्याशी चर्चा करणार आहे.

आपणास माहित असलेल्या एन.पी.ए.चे वर्गीकरण व कराव्या लागणाऱ्या तरतुदीच्या टक्केवारीचा तक्ता संदर्भाकरिता खाली देत आहे.

एन.पी.ए. वर्ग	थकीत हप्ते	सुरक्षित/ असुरक्षित	तरतुदीचे प्रमाण
नियमित कर्ज	६ हप्त्यांपर्यंत	सुरक्षित व असुरक्षित	०.२५%
अनियमित कर्ज	७ ते १८ हप्ते	सुरक्षित व असुरक्षित	५.००%
संशयित बुडीत-१	१९ ते ४२ हप्ते	सुरक्षित	१०.००%
		असुरक्षित	५०.००%
संशयित बुडीत-२	४३ ते ५४ हप्ते	सुरक्षित	१५.००%
		असुरक्षित	५०.००%
संशयित बुडीत-३	५४ हप्त्यांपेक्षा जास्त	सुरक्षित	२०.००%
		असुरक्षित	५०.००%

वरीलप्रमाणे एन.पी.ए. रकमेवर तरतूद संस्थेच्या ढोबळ नफ्यातून करावी लागते. कर्ज खाते एन.पी.ए. मध्ये गेल्यानंतर त्या खात्यावरील थकीत रक्कम एन.पी.ए.मध्ये जात नसून संपूर्ण कर्जबाकी रक्कम एन.पी.ए.मध्ये जाते हे आपणाला माहीतच आहे. ज्या संस्थेची नियमित कर्जाची तरतूद वाढते व इतर चार वर्गातील तरतूद कमी होते ती संस्था चांगल्या प्रकारे कामकाज (परफॉमन्स) करत आहे असे मानले जाते. या उलट ज्या संस्थेची नियमित कर्जाची तरतूद कमी होते व इतर चार वर्गातील एन.पी.ए.ची तरतूद वाढते ती संस्था चांगल्या प्रकारे कामकाज (परफॉमन्स) करत नाही असे मानले जाते. एन.पी.ए.ची तरतूद वाढल्याने आपल्या संस्थेचा निव्वळ नफा कमी होतो हे सांगण्यासाठी तज्ज्ञाची गरज नाही.

निव्वळ नफा कमी झाल्याने ऑडीटच्या ६०० गुणापैकी उत्पन्न/ नफा या विभागातील १०० गुणांवर प्रतिकूल परिणाम होणार आहे व या विभागाला २० टक्क्याचे वेटेज आहे हे आपणास माहीतच आहे. त्याच बरोबर ग्रॉस एन.पी.ए. व नेट एन.पी.ए. चे प्रमाण वाढल्यास जिंदगीची गुणवत्ता या विभागात ६०० गुणांपैकी ५५ गुणांवर प्रतिकूल परिणाम होणार आहे व या विभागाला २५ टक्क्यांचे वेटेज आहे हेही आपणास माहीतच आहे. संस्थेचा एन.पी.ए. वाढल्यामुळे थकबाकीचे प्रमाणही वाढणार आहे. याचाच अर्थ आपणास येत्या तीन महिन्यात एन.पी.ए. रक्कम कमी करण्यासाठी प्रभावी नियोजन करावेच लागेल. त्याकरिता खालील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

सर्व प्रथम ३१ मार्च २०१९ अखेरचे (प्रोजेक्टेड) आपल्या संस्थेच्या सर्व कर्जाचे एन.पी.ए.चे तक्के तयार करून घ्या, कर्ज वसुली संबंधित सर्व संचालकांशी चर्चा करा तसेच संस्थेच्या मुख्य व्यवस्थापकांसह संस्थेच्या कर्ज वसुली विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांबरोबरही नियोजना संदर्भात चर्चा करा.

आपला पहिला प्रयत्न एन.पी.ए.ची रक्कम कमी करणे हा असावयास हवा. प्रथम अनियमित कर्ज वर्गातील खातेदार येत्या ३ महिन्यात नियमित कर्ज वर्गात कसे जातील याचा विचार करा, म्हणजेच ज्या कर्जदारांचे ७/८/९/१० हप्ते थकलेले आहेत त्यांना जास्त प्रमाणात कर्जाची रक्कम भरण्यास सांगून ते कर्ज खाते नियमित कर्ज वर्गामध्ये आणण्याचा प्रयत्न करा. जी कर्जे मोठ्या रकमांची आहेत. उदा. ५/१०/१५/२५ लाखांत आहेत त्या कर्जावरती प्रथम लक्ष केंद्रीत करा व ती खाती नियमित कर्ज वर्गामध्ये आणण्याचा कसोशीने प्रयत्न करा.

दुसरा प्रयत्न एन.पी.ए.च्या तरतुदीची रक्कम कमी कशी करता येईल हा असावयास हवा. त्याकरिता २-४ हप्त्यांची रक्कम जास्त भरून कर्जदार संशयीत बुडीत-३ मधून संशयीत बुडीत-२ मध्ये संशयीत बुडीत-२ मधून संशयीत बुडीत-१ मध्ये व संशयीत बुडीत-१ मधून अनियमित कर्जामध्ये आणण्याचा प्रयत्न करा. असे करण्याने कर्जाच्या एन.पी.ए.च्या रकमेवरील तरतूद काही प्रमाणात कमी होऊ शकेल.

वरील गोष्टी करण्यासाठी आपणास कर्जदारांना संस्थेच्या कार्यालयात बोलावून घ्या किंवा कर्जदाराच्या घरी/व्यवसायाच्या ठिकाणी जाऊन त्यांच्याशी चर्चा करा, त्यांना समजावून सांगा, जादा कर्जे भरण्यासाठी विनंती करा, आपल्या प्रयत्नांना यश येईल याचा मला ठाम विश्वास आहे. याउपरही जे कर्जदार त्यांची कर्ज फेडण्याची ऐपत असूनही कर्ज थकवतात त्यांना कायद्याचा बडगा दाखवलाच पाहिजे.

एखादा कर्जदार नियमित हप्ते भरत असेल, मात्र त्याच्या काही अडचणीमुळे पाठीमागील काही हप्ते भरू न शकल्यामुळे त्याचे खाते एन.पी.ए. मध्ये गेले असेल व त्याच्यावर जामिनदारांकडून दबाव आणूनही हप्ता पेक्षा जास्त रक्कम भरू शकत नसेल तर नवीन चांगले जामिनदार घेऊन, संचालक मंडळाच्या मंजुरीने त्याच्या एन.पी.ए. मधील कर्ज रक्कमेचे नुतनीकरण करून त्यास नवीन हप्ते बांधून द्यावेत मात्र कर्ज रक्कमेचे नुतनीकरण करताना कर्ज रक्कम वाढवून देऊ नये. आपल्या प्रयत्नाला निश्चितच यश येईल याची मला खात्री आहे.

दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्या., मुंबई

रजि. नं. : बी.ओ.एम./डब्ल्यू.पी./आर.एस.आर./(सी.आर)/११०२/१९८७
प्रधान कार्यालय : १/१३६, बी.एम.सी. कॉलनी, मार्वे रोड, अग्निशमन केंद्रासमोर, मालवणी मालाड (प),
मुंबई-९५. दूरध्वनी : ८१०८१६०१०१/११३

संस्थेची ठळक वैशिष्ट्ये

■ तत्पर सेवा ■ कार्यक्षम सेवक वर्ग ■ खेळते भागभांडवल २६४ कोटी ■ प्रधान कार्यालय व १८ संगणकीकृत शाखा
■ कुशल व अभ्यासू नेतृत्व ■ पश्चिम उपनगरातील अग्रगण्य संस्था ■ सभासद ठेवी १७५ कोटी ■ सर्व बँकांपेक्षा २% व्याजदर जास्त
३४५ कोटीचा समिश्र व्यवसायाचा टप्पा पार

आकर्षक ठेव योजना			
दामदुप्पट ठेव	७ वर्षात दामदुप्पट	मुदत ठेव	७.५० ते १०%
दामतिप्पट ठेव	१० वर्षात दामतिप्पट	लखपती ठेव	ठराविक मुदतीनंतर लखपती व्हा
दामचौप्पट ठेव	१२ वर्षात दामचौप्पट	मासिक ठेव	८ ते १०%
मासिक लखपती ठेव/ मासिक व्याज परतावा ठेव			

मा.श्री. आनंदराव माईंगडे
(संस्थापक / अध्यक्ष)
श्री. हरी पाटील (मुख्य व्यवस्थापक)
संचालक मंडळ
वेबसाईट : www.dattseva.com

शाखा विस्तार

मालवणी 8108160101	गोरेगाव 8108160102	गोराई 8108160103	जोगेश्वरी (प) 8108160104	कांदिवली 8108160105	जोगेश्वरी (पू) 8108160106
घाटकोपर 8108160107	मालाड (पू) 8108160108	तुरुकवाडी (कोल्हापूर) 8108160111	नायगाव (वसई) 8108160109	दहिसर 8108160110	शेडगेवाडी (सांगली) 8108160112
म्हाडा मालवणी 02228880065	भांडूप 8422988680	नालासोपारा 8108160120	बांबवडे (कोल्हापूर) 8422988682	अंधेरी (पू) 8425804273	विरार (पू) 8422988681

MAFCOCS

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. पुणे व

सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या., कराड

यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

* आगामी प्रशिक्षण कार्यक्रम *

जानेवारी 2019	सोमवार व मंगळवार दि. ७ व ८	१०० कोटीपेक्षा जास्त व्यवसाय असणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष व सीईओ यांच्यासाठी

प्रशिक्षण स्थळ - हॉटेल उषा ॲशकोट, माथेरान

प्रशिक्षण शुल्क - रू. 7,000/- + जीएसटी 18% (प्रती व्यक्ती)

* संपर्क *

डॉ. श्री. शांतीलाल तेजमल सिंगी, महासचिव - 9371459471

श्री. सुदर्शन अंबादास भालेराव, उपकार्याध्यक्ष/ प्रशिक्षण विभाग प्रमुख - 9850310041

जानेवारी 2019	शनिवार व रविवार दि. १९ व २०	आय.टी., ई.डी.पी. ऑडिट सायबर सेक्युरिटी	या विभागाची जबाबदारी असणारे व कार्यरत असणारे पदाधिकारी, अधिकारी
फेब्रुवारी 2019	शनिवार व रविवार दि. ०२ व ०३ दि. २३ व २४	प्रशिक्षण लेव्हल -३ भाग -१ प्रशिक्षण लेव्हल -३ भाग - १	संचालक, व्यवस्थापक, मुख्य कार्यालयात काम करणारे संचालक, व्यवस्थापक, रोखपाल, लेखनिक

प्रशिक्षण स्थळ

सहकार प्रशिक्षण व संशोधन केंद्र, साईनिवारा टाऊनशिप, शिर्डी, पिंपळगाव रोड, शिर्डी

* संपर्क * - 020-25673008, 25679008

श्री. निकम -9404646709

चेअरमन ऑफ द मंथ
ॲड. दीपक पटवर्धन
अध्यक्ष, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित
रत्नागिरी

गेली ३० वर्षे सहकार जगतात काम करण्याचं भाग्य मला मिळालं. स्वरूपानंद पतसंस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंत प्रगतीच्या प्रत्येक टप्याचा सक्रिय साथीदार होता आलं. या प्रगतीगाथेच्या प्रवासात खूप अनुभव, खूप संधी, आव्हानात्मक प्रसंग, यशदायी आनंदाचे प्रसंग अनुभवले. याच दरम्यान एल.एल.बी. झाला. सनद घेतली. नोकरी सोडून वकिली करू लागलो. स्वाभाविकपणे कार्यकक्षा रुंदावल्या. रत्नागिरी जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीला उभा राहिलो. वयाच्या ३२ व्या वर्षी माजी खासदार निकम साहेबांच्या उमेदवाराचा पराभव करून निवडून आलो. तेथून सलग १९ वर्षे बँकेचा संचालक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. याच दरम्यान पदवीधर नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. स्वरूपानंद यांच्याप्रमाणेच फक्त लहान प्रमाणात पदवीधर पतसंस्था कार्यरत आहे. ९९% वसुली, 'अ' लेखापरीक्षण वर्ग, सातत्यपूर्ण नफा असलेली ही संस्था १८ वर्षे काम करते आहे. या संस्थेची स्वमालकीची जागा आज ताब्यात आली. या संस्थेचे अद्ययावत कार्यालय स्वमालकीच्या जागेत या आठवड्यात सुरू होईल. ही बाब खूप अभिमानाची वाटते.

याच दरम्यान पतसंस्था फेडरेशनची स्थापना केली. हौसिंग फेडरेशनचा अध्यक्ष झालो. राज्य पतसंस्था फेडरेशनवर संचालक म्हणून गेली १५ वें काम करत आहे. पतसंस्था जगतातल्या सर्व शिर्षस्थ संस्थांवर संचालक म्हणून काम करण्याचा भाग्य मला लाभलं.

ज्या कार्यालयात केवळ ७०० रुपये पगारावर कामाला सुरुवात केली, ती नोकरी सोडून त्याच 'महाराष्ट्र राज्य हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशन' या सर्वात मोठ्या महामंडळाच्या संचालक पदाची निवडणूक लढवून विजयी होऊन १० वर्षे या महामंडळाचा संचालक म्हणून काम केलं. कुवरबाव परिसरात शासकीय वसाहतींना कर्ज देण्याचं काम या दरम्यान करता आलं आणि हे महामंडळ म्हणजे राजकीय धुरिणीचा अड्डा होता. अनेक आमदार, अनेक मंत्री या महामंडळात होते. यामुळे स्वपक्षा पलीकडे जाऊन खूप संपर्क आले, संबंध निर्माण झाले. ज्या कार्यालयात १३ वर्षे कर्मचारी होतो तिथेच संचालक होण्याचं भाग्य माझ्या नशिबात होतं याचा खूप आनंद आहे.

याच म्हणजे सन २००० चे दरम्यान रत्नागिरी (जिल्हा) नगर वाचनालयाची जबाबदारी घेतली आणि एक उत्तम वाचनालय, ग्रंथ समृद्ध, तंत्रज्ञानाने सुसज्ज वाचनालय निर्माण करण्यात योगदान देता आलं.

२००७ मध्ये माझी आई निवर्तली. तो काळ खूप दु:खद होता. मी अंतर्बाह्य हललो होतो. आईने या सगळ्या कामात मला भक्कम पाठिंबा दिला होता. आई पासून सलग ८ दिवस ही दूर मी राहिलो नव्हतो. मात्र ती गेल्यावर खूप गांगरून गेलो. त्यानंतर २०१६ मध्ये वृद्धापकाळाने वडील निवर्तले. माझा भक्कम आधार तुटला.

माझी पत्नी, मुलगा हे मला नेहमी प्रोत्साहित करतात. मुलगा वैभव नुकताच एमटेक झाला. तो आता मार्गस्थ होईल.

या ३० वर्षात खूप मित्र जोडले. स्वच्छ राहिलो. पारदर्शकता जपली. इतक्या आर्थिक संस्थांचे अधिकार असून भ्रष्ट मार्गाने गेलो नाही. कोणत्याही संस्थेतून आर्थिक लाभ घेतला नाही. तत्त्व जपली.

आणि महत्त्वाचे म्हणजे सहकार न्यायालयात ३००० पेक्षा अधिक केसेस मी यशस्वीपणे चालवल्या. आज मी अनेक सहकारी संस्थांचा सल्लागार म्हणून कार्यरत आहे.

असा हा माझा प्रवास.... या वळणावर मागे पाहिले तेव्हा मला कृतार्थ वाटते.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेविषयी –

सन १९९१ मध्ये म्हणजे २७ वर्षांपूर्वी रत्नागिरी तालुका कार्यक्षेत्र मर्यादेत झालेली आपली संस्था संपूर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्र काबीज करती झाली आणि पुणे महानगरात स्वरूपानंद पतसंस्थेचे शाखा कार्यालय मोठ्या दिमाखात सुरू झाले. आपल्या सर्व सभासदांच्या दृष्टीने मला ही महत्त्वपूर्ण बाब वाटते. प्रारंभी ३०० सभासदांच्या १०,०००/- भांडवलावर प्रारंभ करत आज २०,५३१ सभासद संख्या आणि रु. ७७,७०,४५०/- एवढे भाग भांडवल १६ शाखा कार्यालये असे विस्तृत स्वरूप आपल्या संस्थेचे झाले आहे हे प्रत्येक सभासदाला आनंद देणारे आणि अभिमान वाटावा असे स्वरूप संस्थेला प्रापत झाले आहे.

जनमानसामध्ये विश्वासार्ह संस्था म्हणून आपली प्रतिमा ठळकपणे उभी करता आली. शिस्त, वक्तशीरपणा याच बरोबर व्यावसायिक दृष्टीकोनाची जोड देत सहकाराचा मूलमंत्र जपत स्वरूपानंद पतसंस्थेचे आर्थिक विश्व चौहोबाजूचे विस्तारत आहे. आर्थिक व्यवहारांना संयत गतीने अग्रेसर करत २८ वर्षे कार्यप्रवण राहिलेली स्वरूपानंद पतसंस्था ही महाराष्ट्रातल्या पतसंस्था जगतात अनुकरणीय संस्था म्हणून अभ्यासली जाते. यातच स्वरूपानंद पतसंस्थेचे उत्तम कामकाज अधोरेखित होते.

आपल्या पतसंस्थेकडे ठेवीदारांचा ओघ सातत्यपूर्ण आहेच. पण संस्थेच्या भागभांडवलातही गुंतवणूक करण्याचे प्रमाण लक्षणीय वाढत आहे. पतसंस्थेचे सभासद, ग्राहक, ठेवीदार, कर्जदार, पिग्मीदार यांची संख्या प्रतिदिन वाढत आहे. ०% एनपीए आणि ९९% वसुली सर्व शाखांची १००% वसुली हा मानदंड संस्थेने

राज्यस्तरीय प्रथम पुरस्काराने सन्मानीत

सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१३-१४

यवतमाळ जि.प.कर्मचारी सहकारी पतसंस्था

मर्या., यवतमाळ

र.जि. नं. १०९

गोधणी रोड, यवतमाळ, शाखा पुसद व वणी

दुरध्वनी- मुख्यकार्यालय : ०७२३२-२४२७४४, शाखा वणी - मुकूटबन रोड -०७२३९-२२८३०७,
शाखा पुसद - तलाव ले आऊट, न्यायालय रोड - ०७२३३-२४५१२५

ISO मानांकनाने प्रमाणीत पगारदार पतसंस्था

आम्ही पार केला २२५ कोटीचा टप्पा

आता वाटचाल २५० कोटी कडे

सन २०१४-१५ चा संस्थेचा निव्वळ नफा ७ कोटी रूपये

सद्याच्या ठेवी २१० कोटी रू.

कर्ज वसुली परीपूर्ण

९ महीन्यावरील ठेवी करीता व्याजदर १२ टक्के

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना संस्थेतर्फे आर्थिक मदत

सातत्याने ऑडीट वर्ग 'अ'

संस्थेची ऑनलाईन सेवा तथा SMS सेवा

लाभांश १५ टक्के

राजुदास जाधव
अध्यक्ष

मारोती उर्फ पवन आत्राम
उपाध्यक्ष

राजेंद्र पिंपळशेंडे
सचिव

नंदेश चव्हाण
शाखा प्रमुख, पुसद

प्रविण राणे
सांस्कृतिक भवन प्रमुख

दिपक दोडके
शाखा प्रमुख, वणी

संचालक मंडळ – संजय गावंडे, दिलीप चौधरी, शेख लुकमान शेख रहेमान, एकनाथ गाडगे, श्रीम. सुचिता बोंदे, गौतम कांबळे, अनिल जयसिंगपुरे, चित्तरंजन कडू, श्रीम. नंदा चाटे, मधुकर काठोळे, मुकेश भोयर, चित्तरंजन कडू, वसंत राठोड (सरव्यवस्थापक)

अबाधीत राखला आहे.

पतसंस्था ही कालमानाच्या गतीशी समतोल चालली पाहिजे. बदलते स्पर्धात्मक अर्थकारण त्याला तांत्रिक साधनांची जोड यामुळे अर्थकारणाचा बदललेला बाज याबरोबर ताळमेळ राखत केवळ ठेवी व कर्ज यासाठी सभासद ग्राहकांना सेवा न देता NEFT/RTGS सारख्या अद्ययावत डिजिटल सेवा ही अन्य बँकांचे सहकार्याने आपण आपल्या ग्राहकांना देत आहोत याचबरोबर स्वरूपानंद पतसंस्थेचे मोबाईल ॲप, मोबाईल पिग्मी कलेक्शन यासारखी अद्ययावत यंत्रणा पतसंस्था वापरत असल्याने स्वरूपानंद पतसंस्था सर्व ग्राहकांसाठी उपयुक्त अर्थकेंद्र बनली आहे.

अर्थकारणात जपावयाचा विश्वास, आर्थिक शिस्त, ग्राहक सेवा या त्रिसुत्रीला आपला स्थायीभाव म्हणून जपत स्वरूपानंद पतसंस्था ही जनमानसातला अर्थकारणातला 'ब्रॅन्ड' झाली आहे आणि हे ब्रॅन्ड नेम याच दिमाखात अविरत अर्थकारण करत सर्वदूर आपल्या कामाचा ठसा उमटवेल हा विश्वास देतो.

सर्व सभासद, ग्राहक, अधिकारी, कर्मचारी, पिग्मी एजंट आणि माझे सहकारी संचालक साथीदार या सर्वांचे तीन वर्षे आणि स्वामी स्वरूपानंदांची कृपादृष्टी सदैव पाठीशी राहो आणि स्वामी स्वरूपानंदांचे नाव त्यालेल्या आपल्या संस्थेचा नंदादीप सदैव तेवत राहो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

२६००० सभासदांची कुटुंब अर्थव्यवस्था स्वामी स्वरूपानंद पतसंस्था केवळ ३०० सभासद एकत्र येऊन १० हजार भांडवलावर २८ वर्षांपूर्वी प्रारंभलेला सहकार यज्ञ म्हणजे स्वरूपानंद पतसंस्था.

प्रारंभी खूप कठीण परिस्थितीला सामोरी जात अनुभवाची शिदोरी संपन्न करत पावलागणिक विश्वासार्हता दृढ करत संस्थेने कोणालाही अभिमान वाटावा अशी सातत्यपूर्ण आर्थिक मजल मारली. २६ हजार सभासद, ३२००० ठेव खाती, १२ हजार कर्जदार, असा हा विशाल समूह ही विशाल संख्या कोट्यावधींची उलाढाल, सातत्याने वर्धिष्णू नफा, विक्रमी वसुली आणि अनेक पुरस्कार सन्मान अशी कृतार्थ वाटचाल गेली २८ वर्षे सातत्याने अग्रेसर होत आहे.

सांख्यकीय आकडेवारी महत्त्वाची असतेच पण ही सांख्यकीय गणिते ज्या सभासद खातेदारानी दृढ केली ते सभासद आकडेवारी पेक्षा अधिक महत्त्वाचे. कारण सहकारात माणसाला महत्त्व आहे. सहकार्याच्या भावनेला महत्त्व आहे. एका उद्दिष्टाने प्रेरित होऊन एकत्र आलेल्या सभासदांचा एकजीनसी समूह आणि या समूहाचे सहयोगातून उभे राहिलेले भांडवल, त्यातून होणारे व्यवहार हे चक्र सातत्याने सुरू राहण्यात संस्थेशी संलग्न असलेल्या प्रत्येकाच्या योगदानाची ताकद म्हणजे स्वामी स्वरूपानंद पतसंस्था.

गेली २८ वर्षे या संस्थेच्या शिर्षस्थानी राहून सहकार मंत्र जपला अनेक निर्णय घेत अनेक उपक्रम राबवत विश्वास, शिस्त, जपत अविरत मेहनत करत कौटुंबिक व्यावसायिक गोष्टींना वेळप्रसंगी बाजूला ठेऊन संस्थेसाठी घेतलेल्या जबाबदारीचे निर्वहन याला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला. अनेक माणसे जोडली या सर्वातून हे यश प्राप्त झालं.

१५४ कोटींच्या ठेवी, ११० कोटींची कर्जे, १९ कोटींचा स्वनिधी, ६५ कोटींची बँक गुंतवणूक, ४ कोटीच्या घरात निव्वळ नफा, १५ शाखा, राज्य कार्यक्षेत्र, ६ स्वमालकीची कार्यालये व १०० च्या घरात पोचलेला कर्मचारी वर्ग असा हा प्रशस्त विस्तार खूप समाधान देणारा, प्रामाणिक व पारदर्शक पद्धती, शिस्त, नि:स्वार्थी सेवा आणि स्वामींचे अधिष्ठान या सर्वांवर उत्तुंग शिखराकडे मार्गस्थ असणारी आपली सर्वांची जिव्हाळ्याची स्वामी स्वरूपानंद पतसंस्था.

■■■

नामांकन (नॉमिनेशन) एक आवश्यक सुविधा

आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक वाढवावे।।
मिळवित तितुके भक्षिती । ते तो कठीण काळी मरोनि जाती ।।
दीर्घ सूचनेने वर्तती । तेचि भले ।।

श्री समर्थ रामदांचे हे विचार ध्यानी घेऊन काही व्यक्ती बँकेत/पतसंस्थेत बचत करतात. मुदत ठेवही ठेवतात. आपण ठेवलेली ठेव आपल्या अडीअडचणीला उपयोगी व्हावी असा विचार करीत असतानाच त्या ठेवींचा उपयोग आपल्या मुलाबाळांनाही व्हावा असा 'दीर्घ' विचार जे करतात ते त्या ठेवींना 'नामनिर्दे शनाची' सोय करून ठेवतात. 'नामनिर्देशन' करण्याने नैर्बंधिक सोय करून ठेवतात. 'नामनिर्देशन' करण्याचे नैर्बंधिक क्लिष्टता दूर होते. नामनिर्देशनाला पर्यायी शब्द 'नामांकन' (नॉमिनेशन) असा वापरला जातो. नामांकरण करणे म्हणजे 'नॉमिनी' नेमणे – एक प्रकारचा 'वारस' लावणे.

आपल्याकडे 'वारस' हा शब्द वापरतांना 'वैधानिक वारस' (लिग हेअर) अशा अर्थानेच वापरला जातो. 'वारस' या शब्दामध्ये विशेष प्रकारचे गांभीर्य आणि 'दायित्व' ध्वनित होते. 'वारस' या शब्दाला पूर्वापार चालत आलेल्या परंपरेला आणि हिंदुस्थानात असलेल्या विविध धर्म-पंथांच्या ग्रंथांचा आधार आहे. वारस कोणाला म्हणाले, वारस कोण ठरतो याबाबत धर्मानुसार आणि त्यांच्या ग्रंथानुसार विविधता आढळेल. मात्र 'नॉमिनी' – नामनिर्देशित व्यक्ती या शब्दाने 'वारस' शब्दाला एकतेचा – एक वाक्यतेचा आधार दिलेला आहे. ठेवीदाराने ठेवलेली रक्कम ठेवीदाराच्या मृत्युनंतर कोणाला मिळावी त्या व्यक्तीचे नाव बँकेला/ पतसंस्थेला लिहून देणे म्हणजे 'नॉमिनी नेमणे', नामांकन करणे, नामनिर्देशन करणे होय.

नामांकनाला वैधानिक आधार – बँका, पतसंस्था, विमा कंपनी, खाजगी, वित्तीय संस्था अगर तत्सम आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्थांमध्ये ठेव खाते उघडताना, वस्तू/ जिनसा सुरक्षित ठेवताना सुरक्षा गृहात असलेल्या कपाटातील सुरक्षा कप्पा (लॉकर) भाड्याने घेताना, विमा पॉलिसी घेताना ठेवीदाराला त्याच्या/ तिच्या वतीने 'नामनिर्देशन' करण्याची नॉमिनी नेमण्याची विशेष सुविधा बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट १९६० (सुधारित) अन्वये आणि तत्सम कायद्यांन्वये देण्यात आलेली आहे. रिझर्व्ह बँकेने १९८५ मध्ये 'नॉमिनेशन फॅसिलिटीज् रूल्स' कार्यवाहीत आणले आहेत. नामांकनाची कार्यपद्धती त्या अंतर्गत निश्चित करण्यात आलेली आहे.

प्रत्येक बँकेने/ पतसंस्थेने ठेवींसाठी आणि इतर सुविधांसाठी विशिष्ट प्रपत्र विकसित करून छापून घेतलेले असतात. त्या प्रपत्रावर (फॉर्मवर) नामांकन नामनिर्देशन सुविधेसाठी एक परिच्छेद/ रकाना ठेवलेला असतो. या परिच्छेदामध्ये ज्या व्यक्तीच्या नावाने नामनिर्देशन करावयाचे आहे, ज्या व्यक्तीला 'नॉमिनी' करावयाचे आहे त्या व्यक्तीचे नाव व संपूर्ण पत्ता लिहावयाचा असतो. त्या व्यक्तीचे वय / जन्मदिनांक आणि नामनिर्दे शन करणाऱ्या – नॉमिनी नेमणाऱ्या व्यक्तीचे व नॉमिनीचे नाते लिहावयाचे असते.

नामांकन कोणाच्या नावाने करावे ? नामनिर्देशन कोणच्या नावाने करता येते. नॉमिनी कोणाला नेमता येते? मुख्यत: नामनिर्देशन केवळ एका व्यक्तीच्या नावाने करता येते. अशी नॉमिनी व्यक्ती नामनिर्देशन करणाऱ्या व्यक्तीची नातेवाईकच असली पाहिजे अशी

मात्र अट नसते. मित्र/मैत्रिणी सुद्धा चालते. मात्र ज्या व्यक्तीच्या नावाने नामनिर्देशन करावयाचे ती व्यक्ती 'कॉन्ट्रॅक्ट' ॲक्टनुसार 'करार' करण्यास पात्र असली पाहिजे म्हणून अवयस्क (मायनॉर) व्यक्तीच्या नावाने नामनिर्देशन करताना त्या अवयस्काच्या वतीने स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीचे शक्यतो आई-वडील यापैकी एकाचे नाव देणे आवश्यक ठरते. अवयस्क व्यक्तीची जन्मदिनांक दर्शविणारा एखादा पुरावा / प्रमाणपत्र घेणे बँकेच्या/ संस्थेच्या हिताचे असते. अलिकडे वय वर्षे १० पूर्ण केलेल्या मुला/मुलींना त्यांच्या स्वत:च्या नावाने आणि स्वाक्षरीने खाते उघडण्याची अनुमती दिली जाते. अशा अवयस्क व्यक्तीला स्वत: पुरते पैसे काढणे आणि स्वत:चे - खाऊचे/ शिष्यवृत्तीचे पैसे ठेवणे इतके मोजके व्यवहार करण्याची अनुमती दिलेली असते. अशा अवयस्क व्यक्तीला नामांकन करण्याचा अधिकार नसल्याने त्या नामांकनाच्या परिच्छेदामध्ये नॉमिनी नेमताना अवयस्काच्या वतीने आई/वडिलांची स्वाक्षरी घ्यावी लागते.

नामनिर्देशन कोणत्याही संस्थेच्या, दुकानाच्या, व्यवसायाच्या - फर्म, कंपनी, सहकारी अथवा धर्मादाय संस्था अशा नावाने करता येत नाही. एक मालकी/ स्वामित्व असलेल्या 'प्रोपायटरी' फर्मच्या वतीने नामनिर्देशन करता येते. मात्र कोणाही संस्थेच्या खात्याच्या पदाधिकाऱ्याच्या/ भागीदाराच्या व्यक्तीगत नावाने अथवा संस्थेच्या उपसंस्थेच्या नावानेही करता येत नाही.

संयुक्त नावाने जोड नावांनी खाते उघडले तर त्याकरिता एका व्यक्तीच्या नावाने नामनिर्देशन करता येते. मात्र त्या परिच्छेदावर संयुक्त खाते ज्यांच्या ज्यांच्या नावावर आहे त्या सर्वांच्या स्वाक्षऱ्या अपेक्षित असतात. संयुक्त खाते कसे चालवावयाचे त्या खात्यातील रकमा कोणाला द्यावयाच्या याबाबत व्यवहार करण्याच्या सूचना वेगळ्या घ्याव्या लागतात. नामनिर्देशन हा विषय त्या सूचनांशी जुळणारा असलेच असे नाही. एखाद्या खातेदाराला/ खातेदारांना 'नॉमिनी' नेमावयाचाच नसेल तर त्या नामनिर्देशनाच्या परिच्छेदात तसे स्पष्ट लिहून घ्यावे. ''नॉट रिक्वायर्ड'' अशा आशयाचा शेरा लिहावा. परिच्छेदावर खातेदाराची/ खातेदारांच्या स्वाक्षरी स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

साक्षीदाराचे महत्त्व : नामनिर्देशन करताना त्या परिच्छेदाचे जागी एका साक्षीदाराची स्वाक्षरी घ्यावी. बँक/ संस्था अधिकाऱ्यांना 'निश्चिती' असेल तर साक्षीदार म्हणून त्यांची स्वाक्षरी चालते. मात्र अवयस्काच्या आणि अशिक्षित व्यक्तीच्या खात्यांसाठी दोन माहितगार - त्या व्यक्तींना ओळखणाऱ्या व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात. अशिक्षित व्यक्तीच्या आंगठ्याची निशाणी/ ठसा बँक/ संस्था अधिकाऱ्याने / कर्मचाऱ्याने आपल्यासमोर करून घ्यावा.

ग्राहक जागृती :- असे अनुभवयास आले आहे की संयुक्त खात्यांबाबत / अशिक्षितांच्या खात्यांबाबत नामनिर्देशन (नॉमिनी नेमण्याबाबत) खातेदारांची उदासीनता दिसते.

विमान अपघात, रस्ता/रेल्वे अपघात, पूर-अतिवृष्टी भूकंप अशा घटनांच्यावेळी संयुक्त खात्यातील एकही व्यक्ती जिवंत राहिलेली नाही अशा प्रसंगी नामनिर्देशन केलेले लाभदायक ठरल्याचे लक्षात येते. सर्वच खातेदारांना नॉमिनी नेमण्याविषयी जागृत केले गेले पाहिजे. बँकेच्या / संस्थेमध्ये दर्शनी भागात नामांकन सुविधेबाबतचे फलक माहितीपत्रके लावलेली असावीत. सरकत्या सूचनांद्वारे 'डिसप्ले' बोर्डवर त्यास प्रसिद्धी द्यावी.

मुदत ठेवीची मुदत संपल्यानंतर सर्व खातेदारांच्या संमतीने - सूचनेप्रमाणे आणि / अथवा आपोआप (रोल ओव्हर) मुदत ठेवीचे नूतनीकरण करण्यात येते. अशा वेळी आधी नेमलेला वारस (नॉमिनी) पुढेही आपोआप चालू राहतो. याची ग्राहकाला कल्पना असली पाहिजे. बँकेच्या / संस्थेच्या संगणक प्रणालीमध्ये तशी तरतूद असली पाहिजे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नॉमिनी नेमण्याबाबत १९८५ मध्ये विशिष्ट नियमावली तयार केलेली आहे. त्याप्रमाणे बँका, पतसंस्था आणि इतर वित्तीय संस्थांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

नातेवाईक कोण ? :– 'नॉमिनीच्या संदर्भात जेव्हा 'नातेवाईक' या शब्दाचा उल्लेख येतो तेव्हा 'नातेवाईक' या शब्दाची व्याख्या, माझ्या मते, आयकर कायद्याच्या कलम २ (४) ४०अ (२) आणि ५६ (२) क्लॉज ४ व ५ अन्वये करण्यात आलेली व्याख्या विचारात घ्यावी.

आपल्याला ठेव खाते उघडून घेताना के.वाय. सी. पूर्तता करणे बंधनकारक आहेच. सुमारे ८ ते १० वर्षाच्या कालावधीनंतर ठेव खात्याला नव्याने के.वाय. सी. पूर्तता करून घेणे खातेदाराच्या आणि बँकेच्या/ संस्थेच्या हिताचे असते. त्या निमित्ताने नामांकन सुविधाची उजळणी होते.

नोंद कशी करावी : 'नॉमिनी'ची नोंद 'ठेव पावतीवर आणि ठेव खात्याच्या पासबुकावर करून दिली जावी. काही व्यक्तींना अशी नोंद गुप्त ठेवावी अशी इच्छा असते. त्यांनी तसे बँक/ पतसंस्था शाखेस सांगावे. मात्र स्वत:कडे न चुकता पोहोच पावती घेऊन ठेवावी. इच्छापत्र (बिल) केल्याची कल्पना जशी पती/पत्नीला दिलेली असावी तशीच आणखी एका जवळच्या मित्र/मैत्रिणीला दिलेली असावी. इच्छापत्र आणि नॉमिनीची नोंद यापैकी जी सूचना अलिकडची (लेटेस्ट) असेल ती कार्यवाहीत आणली जाते.

'नॉमिनी' – नामनिर्देशनाची वेगळी नोंद वही (रजिस्ट) ठेवणे अपेक्षित आहे. आता अलिकडे ही नोंद संगणक प्रणालीद्वारे पडद्यावर दिसेल अशा पद्धतीने केली जाते. रिझर्व्ह बँकेने केलेल्या नियमांप्रमाणे नामनिर्दे शनाची पोहोच पावती खातेदाराला देणे बंधनकारक आहे. नामनिर्देशनात बदल करतानाही – रद्द करतां नाही अशा स्वरूपाची पोहोच पावती दिली पाहिजे.

इच्छापत्राचे महत्त्व :– एकाच बँकेच्या किंवा वेगवेगळ्या बँकांच्या वेगवेगळ्या खात्यांवर वेगवेगळे नॉमिनी नेमता येतात हे जरी खरे असले तरी ज्यांचा व्यवहार मोठा असतो त्यांनी इच्छापत्रात याचा एकत्रित उल्लेख केलेला असावा. निवृत्तीवेतन जमा करण्यासाठी उघडलेल्या बचत खात्याला १९८३ च्या आणि १९८५ च्या अशा दोन्ही नियमांप्रमाणे 'नॉमिनी'ची नोंद करावी लागते.

येथे एक बारकावा स्पष्ट करणे आवश्यक वाटते तो पुढीलप्रमाणे – महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटी कायदा १९६० च्या कलम २८(२) अन्वये सहकारी संस्थेच्या भागधारकाला 'नॉमिनी' नेमात येतो. भागधारकाच्या मृत्यूनंतर भागभांडवलाची रक्कम 'नॉमिनी'ला मिळते, परंतु 'नॉमिनी' हा आपोआप भागधारक होत नाही. जे ठेवीदार सहकारी संस्थेचे बँकेचे सभासद नसतील त्यांना १९८५ च्या नियमांप्रमाणे 'नामनिर्देशन' करावेच लागते.

मालकी हक्क केव्हा ? :– 'नामनिर्देशन' केवळ रक्कम स्वीकारण्याचा हक्क प्राप्त करून देते. नामनिर्दे शनाने मालकी हक्क प्राप्त होत नाही. हिंदुस्थानातील विविध न्यायालये आणि सर्वोच्च न्यायलय यांनी 'नॉमिनी' हा ठेवीदाराचा 'विश्वस्त' असतो ही भूमिका स्वीकारलेली आहे. ठेवीदाराच्या मृत्यूनंतर ठेव रक्कम स्वीकारून ठेवीदाराचे जे रीतसर वारस (कायदेशीर) असतील त्यांना ती रक्कम विभागून देण्याचे दायित्व त्या 'नॉमिनी'वर असते. इच्छापत्रानुसार मालकी हक्क प्राप्त होतो हे लक्षात घ्यावे लागते. 'नॉमिनी' कडून विश्वस्ताची भूमिका पार पाडीत असताना जर वाद निर्माण झाला तर न्यायालयाची दारे ठोठवावी लागतात.

नामनिर्देशन करून देणारी ठेवीदार व्यक्ती मृत्यू पावल्यानंतर नॉमिनीला अत्यंत जुजबी कागदपत्रांची – जसे मृत्यूचा दाखला, रुग्णालयाची नोंद, नॉमिनीची ओळख पटविणारी कागदपत्रे सादर करून रक्कम दिली जाते. कोणत्याही स्थितीत रक्कम रोख दिली जाऊ नये. नॉमिनीकडून रकमेचा विचार करून क्षतिपूर्ती करार (इंडेम्निटी बाँड) स्टॅम्प पेपरवर करून घ्यावा असे माझे

मत आहे.

व्यवहार नसलेली खाती :– रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार व्यवहार नसलेल्या खात्यांची संख्या आणि त्यामध्ये अडकलेली रक्कम याचे प्रमाण मोठे आहे. बँकांनी / पतसंस्थांनी अशा खात्यांचा आढावा घेऊन संबंधित खातेदार अथवा त्यांचे 'वारस' यांच्याशी संपर्क साधावा. नामनिर्देशनाची सोय झाल्यापासून अशा व्यवहार नसलेल्यांची संख्या कमी होत आहे असे लक्षात येते.

लॉकरची नॉमिनी :– बँकेच्या सुरक्षित गृहातील कप्प्यांमध्ये वस्तू ठेवण्यास देणे (सेल्फ कस्टटी) आणि सुरक्षा गृहातील कपाटांमधील सुरक्षा कप्पा (लॉकर) भाड्या घेणे या बाबत 'बेलॉर – बेली' संबंध, गरमालक–भाडेकरू संबंध याचा विचार करावा लागतो हे लक्षात घेऊन या दोनही बाबतीत नामनिर्देशन करून घेणे आजच्या धकाधकीच्या जीवनात अत्यंत आवश्यक ठरते. बँकेचा पतसंस्थेचा 'लॉकर' मधील वस्तूंशी प्रत्यक्ष संबंध नसतो. 'लॉकर' दोन किंवा तीन व्यक्तींच्या नावाने भाड्याने घेऊन त्यापैकी एकाला ते उघडण्याचा अधिकार देण्याच्या सूचना नोंदवून घेणे अधिक चांगले. नामनिर्देशित व्यक्तीला लॉकर उघडण्यास अनुमती देताना पुरेशी ओळख पटविण्याबरोबर लॉकर उघडल्यानंतर त्याच्यातील चीज वस्तूंचा 'पंचनामा' करून त्या नामनिर्देशित व्यक्तीच्या ताब्यात देणे आवश्यक ठरते.

बँकेचा/ पतसंस्थेचा एकूण आकार आणि खात्यातील शिल्लक रक्कम या नुसार नामनिर्देशित व्यक्तीला मयत खातेदाराच्या खात्यातील शिल्लक देणे, लॉकर ताब्यात देणे, याबाबतचे अधिकार त्या त्या संस्थेतील पदाधिकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना दिले जातात.

संयुक्त (जोड) खात्यातील एका ठेवीदाराचा मृत्यू झाल्यानंतर राहिलेल्या ठेवीदाराने / ठेवीदारांनी नामनिर्देशन बदलण्याचे ठरविल्यास तसे करता येते. मात्र कोणत्याही परिस्थितीत नामनिर्देशित व्यक्तीला त्याचा/ तिचा अधिकार त्या खात्यावरील सर्व ठेवीदारांच्या पश्चातच बजावता येते. (वापरता येते)

ज्या खात्याला अवयस्काच्या नावाने नामनिर्देशन केलेले असेल आणि त्या व्यक्तीच्या अवयस्काच्या काळात (वय १८ वर्षे पूर्ण होण्याआधी) ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास अवयस्काच्या वतीने स्वाक्षरी करण्याचा अधिकार ज्या व्यक्तीला दिलेला असेल अशी कायद्याने अधिकृत व्यक्ती Law fully entitled to act on behalf of minor ठेवीची रक्कम स्वीकारेल.

ठेवीदाराच्या मृत्यूनंतर मुदत ठेवीची मुदत संपेपर्यंत नामनिर्देशित व्यक्तीला ठेवीचे तारणावर कर्ज घेता येणार नाही. मुदत ठेवीची मुदत संपल्यानंतरच नामनिर्देशित व्यक्ती त्या ठेवीची हक्कदार होते असे माझे मत आहे.

नामनिर्देशन केलेले असताना एखाद्या ठेवीदाराचा 'वारस' निश्चित ठरविण्याबाबत गुंतागुंत असेल, क्लिष्टता असेल, स्पष्टता नसेल अशा प्रसंगी बँकेच्या/ संस्थेच्या विधीशाचा समावेश (सल्ला) घेणे योग्य ठरते.

(लेखक – सेवानिवृत्त बँक कार्यपालक आहेत.)

– श्रीकांत विठ्ठल ताम्हनकर
फोन : ९०११०९६९७७

तारणी कर्ज / स्थावर मालमत्तेचे गहाणखत

गहाणखत लिहून घेताना घ्यावयाचे मुद्दे :

१) ७/१२ चा उतारा / सिटी सर्व्हे चा उतारा -

शेतीची जमीन अगर बिगरशेती - अकृषक असा शेरा असतो.

गावाचे नाव, तालुका, खाते नंबर, सर्व्हे नंबर/ गट नंबर/ हिस्सा नंबर - क्षेत्र हे. आर आकार रुपये पैसे कबजेदार - इतर हक्क

सत्ता प्रकार -

१) सत्ता प्रकार १ - अ) रीत १ संपूर्ण अनिर्बंध मालक

२) सत्ता प्रकार २ - ब- रीत २ - निर्बंध असलेली मालमत्ता, कलेक्टरच्या परवानगीशिवाय हस्तांतर / गहाणखत करता येत नाही.

१) सत्ता प्रकार ३ - क - रीत ३ - खंडाची जमीन, खंडरोख्यात गहाण देणेस परवानगी असल्यास हस्तांतर / गहाण पात्र. गव्हर्नमेंट लीज असल्यास परवानगीची जरूरी नाही.

पीक पेऱ्याचा तपशील - बिगरशेती असल्यास बिनशेती पड. वर्ष, कूळ आणि खंड, क्षेत्र, रीत, पिके व लागवड क्षेत्र, शेरा

७/१२ सिटी सर्व्हे उतारा संगणकावर नेटवर उपलब्ध असतो. मात्र गहाणखतासोबत जोडताना तलाठी / सिटी सर्व्हे ऑफिसरकडील प्रमाणित सत्यप्रत जोडावी लागते.

२) सर्च रिपोर्ट -

मालकाचे नाव -

मिळकतीचे वर्णन -

सत्ता प्रकार - जुनी शर्त / नवी शर्त/ सत्ता प्रकार अ, ब, क (गव्हर्नमेंट लीज)

सत्ता प्रकार २ - ब रीत २ च्या मिळकती गहाण घेणे असल्यास कलेक्टरची परवानगी आवश्यक. अज्ञानाचा हक्क हितसंबंध आहे काय? अज्ञानाची मिळकत असल्यास डिस्ट्रिक्ट कोर्टाची परवानगी आवश्यक.

शेतजमीन, बिनशेती - बिनशेती असल्यास बिनशेतीचा आदेश मंजुरी बिनशेतीचे कारण (पर्पज), बिल्डिंग प्लॅन मंजुरी, बांधकाम परवानगी, बांधकाम पूर्णत्वाचा दाखला. १३ वर्षांचे कालावधीत झालेले व्यवहार पाहणे आवश्यक.

१३ वर्षांच्या नोंदी असलेला ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेले सर्व फेरफार आज मालक असलेली व्यक्ती कशी मालक झाली?

खरेदी खत फेरफार - वाटप, मृत्यूने वारसा हक्काने/ बक्षीसपत्र/ दान.

मिळकतीचा ताबा - भाडेकरूच्या ताब्यात मिळकत नाही याची खात्री करणे.

कर्जाचे तारण चार्ज, अॅटॅचमेंट, मॉर्गेज, कोर्ट ऑर्डर ने बोजा आहे / नाही.

राईट, ओनरशिप टायटल, इंटरेस्ट पझेशन क्लीअर व मार्केटेबल आहे असा दाखला.

फ्लॅटचे बाबत - गहाण देणेचे हक्क दिला आहे काय? नसल्यास स्वतंत्र पत्र घेणे.

शेतजमिनीबाबत किमान १३ वर्षे आणि बिगरशेती मिळकतीबाबत किमान ३० वर्षे सच घ्यावा. सर्च मध्ये रेव्हेन्यूकडील रेकॉर्ड व दुय्यम निबंधक (खरेदीविक्री नोंदविणारे कार्यालय) यांचेकडील फी भरून शोध घेणेत यावा. बऱ्याचदा रेव्हेन्यू रेकॉर्ड मध्ये रजिस्टर्ड दस्तांची नोंद केलेली नसते. याबाबत खात्री करून घ्यावी.

३) गहाणखत -

लिहून घेणार - पतसंस्थेचे नाव, रजि नं. रजिस्टर्ड पत्ता व लिहून घेणेसाठी संस्थेच्या संचालक मंडळाने ठराव करून अधिकृत केलेली व्यक्ती, गहाणखत नोंदविताना उपस्थित रहावे.

लिहून देणार - व्यक्ती, भागीदारी फर्म, प्रा.लि. कंपनी, पब्लिक लि. कंपनी गहाण जामीनदार असू शकतो.

लिहून देणार पतसंस्थेचे सभासद आहेत - सभासद

करून घेणे अत्यावश्यक मिळकतीचे वर्णन – सर्व्हे / गट नं. क्षेत्र, आकार व चतु:सीमा व चतु:सीमा प्रमाणित केलेल्या असाव्यात. – खरेदी खत, तलाठी अगर टीआयएलआर / गावचा नकाशा कर्जाचा प्रकार, कर्जाची रक्कम, भरण्याचा तपशील, कर्ज रक्कम अगोदर अदा केलेली असणे, भविष्यात अदा करावयाची, एकदम अदा करावयाची, वेळोवेळी उचलणेस परवानगी देणे.

व्याजाचा दर, व्याज आकारणीची पद्धत, परतफेडीची मुदत, हप्ते व रक्कम, अन्य दस्तऐवज लिहून दिले त्यातील अटी मान्य.

कर्जाच्या शर्ती – लिहून देणार मिळकतीचे मालक आहेत त्यांना गहाण देणेचा हक्क आहे.

मिळकत निर्वेध आहे, वादात नाही, दाव्याचा विषय नाही. कर्जाचे परतफेडीकरिता मिळकत गहाण तारण देत आहे, ताबा लिहून देणारकडे आहे.

हप्ता थकल्यास इतर हप्त्यांची सवलत न सांगता सर्व रक्कम एकदम देय होईल.

कर्ज थकल्यास कर्ज हप्त्यांची सवलत न सांगता सर्व रक्कम एकदम देय होईल.

कर्ज थकल्यास कर्ज वसुलीसाठी तारण मालमत्ता विक्री करून रक्कम वसूल करणेचा अधिकार लिहून घेणार पतसंस्थेस प्राप्त होईल.

भविष्यात दुसरे कर्ज दिल्यास अगर लिहून देणार यांचेकडून अन्य कोणत्याही कर्जाकरिता वसुली करावयाची असल्यास सदर मालमत्ता विकून कर्ज वसूल करता येईल असा अधिकार दिला आहे. लेटर ऑफ कंटिन्यूटी (सीसी/ हायपो. कर्ज)

तारण मालमत्तेचे हस्तांतरण करणार नाही, पतसंस्थेस असाईनीला हस्तांतर करता येईल. पतसंस्थेस इन्पेक्शन करता येईल. गहाणदार पतसंस्थेच्या लेखी परवानगी शिवाय मिळकतीचे कर्ज फिटेपर्यंत हस्तांतर करणार नाही.

जादा तारणाचा लेख लिहिताना पूर्वीच गहाणखताचा उल्लेख करून फक्त वाढवा रकमेवर स्टॅम्प देता येईल. जादा कर्ज रकमेसहचे एकूण कर्जाकरिताचे संस्थेचे नवीन कागदपत्रे करारनामे, जामीनरोखा इ. करून घेणे.

गहाणखतात नमूद केलेले कर्ज खाते चालू असताना त्यात पूर्ण रक्कम भरली तरी कर्जदारास पुन्हा कर्ज उचलता येईल. खाते बंद होणार नाही. सदरचे कर्जाची पूर्ण रक्कम भरून खाते बंद केल्यास व पुन: नवीन कर्ज घेतल्यास, त्या कर्जासाठी सदरचे गहाणखत लागू राहील, तसेच या पतसंस्थेचे जामीनकीचे अगर अन्य कोणतेही कर्जाची रक्कम देय असल्यास त्या कर्जाकरिताही सदरचे गहाणखत लागू राहील.

गहाणखत नोंदविणे आवश्यक, ७/१२ चे उताऱ्यास पतसंस्थेचा बोजा नोंदवून आणणे, फेरफार दप्तरी घेणे, दुरूस्त ७/१२ घेणे, नंतर कर्ज रक्कम अदा करणे.

नोटस – गहाणखताकरिता दोन साक्षीदार संस्थेच्या वतीने असावेत. कर्मचारी, संचालक चालतील.

गहाणखताची मुदत १२ वर्षे असते. (टी.पी. ॲक्ट) कर्ज मुदत कर्ज हप्तेबंदीने फेडावयाचे असल्यास हप्त्यांची मुदत +१२ वर्षे. (याचा लाभ एनपीए करिता नाही.) गहाणखताचे कर्ज फिटल्यानंतर रिलीज डीड दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदविणे आवश्यक. खर्च कर्जदाराने करावा.

गहाणखतात – सदरचे गहाणखत या दस्तात नमूद केलेल्या कर्जासाठी, या कर्जाची परतफेड झाल्यानंतर पुन्हा याच प्रकारचे कर्ज लिहून घेणार पतसंस्थेने दिले तर त्यासाठी तसेच कर्जदार / गहाणदाराने अन्य कोणतेही कर्ज लिहून घेणार पतसंस्थेकडून भविष्यात घेतल्यास त्या कर्जासाठी ही लागू राहील व अशा सर्व कर्जाचा मुद्दल व्याज व खर्चासह देय होणाऱ्या रकमेचा बोजा या दस्ताने लिहून देणार करून देत आहेत.

अगोदर दुसऱ्या वित्तीय संस्थेस गहाण दिलेली असल्यास, प्रथमचे गहाणाचा चार्ज फर्स्ट चार्ज, नंतरचा चार्ज सेकंड चार्ज. दावा कोणीही केला दावा प्रथम सेकंड चार्ज असलेल्या संस्थेने केला तरीही.

तरी प्रथम फर्स्ट चार्ज असलेल्या संस्थेचे कर्ज फेडावे लागेल, नंतर दुसऱ्यास उरली तर रक्कम मिळेल.

(संकलित)

■■■

5 कोटी ठेवी असणाऱ्या पतसंस्थेस दिला जाणारा महाराष्ट्रातील मानाचा 2018 चा वर्षाचा 'दिपस्तंभ' पुरस्कार संस्थेस देऊन महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन कडून आपल्या उत्कृष्ट कार्याबद्दल गौरविण्यात आला आहे.

श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्या., मुरूम

वरनाळे कॉम्प्लेक्स, मेन रोड, मुरूम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

शाखा - मुरूम, पिन नं. 413605, मो.नं. 8459073101

आर्थिक स्थिती	
ठेवी	54142777
कर्ज	51506496
गुंतवणूक	21071866
वसुल भाग भांडवल	7711500

उपलब्ध सुविधा
सोने तारण कर्ज, वेअरहाऊस कर्ज
व इतर छोट्या मोठ्या उद्योगांना गहाणखत
बोजा घेऊन सुयोग कर्ज वितरण



श्री. वरनाळे शिवशरण गुरलिंगप्पा

संस्थापक अध्यक्ष

संचालक मंडळ

श्री. जाधव कमलाकर काशिनाथ (सचिव)

श्री. जाधव अशोक श्रीरंग

श्री. वरनाळे अम्रत भिमराव

श्री. मुदकण्णा मनिष लिबण्णा

श्री. पाटील नागेश शंकरराव

सौ. पवार मनिषा रणधिर

श्री. मुदकण्णा शरणप्पा सिद्रामप्पा (उपाध्यक्ष)

श्री. बिराजदार श्रीशैल सिद्रामप्पा

श्री. बोदर मनोज मारूती

श्री. लोखंडे इंद्रजित सिद्राम

श्री. मायाचारी श्रीशैल मारूती

सौ. बिराजदार कलावती आनंदराव

सर्व सभासद व कर्मचारी वृंद

सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील पतसंस्थांना थेट भेट

सावंतवाडी येथील कँथालिक अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीला भेट दिली असता संस्थेचे अध्यक्ष श्री. पीटर पेंन्टस हे स्वागत करताना सोबत सैनिक पतसंस्थेचे कार्यकारी संचालक श्री. सुनील राऊळ, श्री. अंनत कुळकणी, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष श्री. सुदर्शन भालेराव, व सुनिल दरेकर, इतर मान्यवर.

सावंतवाडी येथील स्नेह नागरी सहकारी पतसंस्थेला भेट दिली असता संस्थेचे अध्यक्ष श्री. अनंत उसगावकर हे स्वागत करताना श्री. पीटर पेंन्टस, सैनिक पतसंस्थेचे कार्यकारी संचालक श्री. सुनील राऊळ, श्री. अंनत कुळकणी, सुनिल दरेकर महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष श्री. सुदर्शन भालेराव.

कोल्हापूर जिल्ह्यांतील पतसंस्थांना थेट भेट

गजानन नागरी सहकारी पतसंस्था पोटोळेवाडी या संस्थेला भेट दिली असता संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रा. सुनिल भोसले, श्री. सुरेश घाटगे, श्री. सुनिल दरेकर व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष श्री. सुदर्शन भालेराव.

इचलकरंजी येथील वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेला भेट दिली असता संस्थेचे संचालक श्री. शिवाजी पोवार, श्री. विजय आवळे, सौ. उज्वला आगरे, श्रीमती मालुताई रूग्गे, व्यवस्थापक श्री. सुभाष मलिकावडे, श्री. सुनिल दरेकर व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष श्री. सुदर्शन भालेराव.

बांबवडे ता. शाहूवाडी येथील महादेव ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्थेला भेट दिली असता संस्थेचे अध्यक्ष श्री. पांडुरंग कुंभार, सहाय्यक निबंधक श्री. चोपडे, सहकारी अधिकारी, श्री. लाड, इतर संचालक व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष श्री. सुदर्शन भालेराव.

बांबवडे ता. शाहूवाडी येथील बांबवडे नागरी सहकारी पतसंस्थेला भेट दिली असता संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रप्रकाश पाटील व सहाय्यक निबंधक श्री. चोपडे, श्री. लाड, व्यवस्थापक श्री. अल्लबक्ष मुल्ला इतर संचालक व सेवक वर्ग व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष श्री. सुदर्शन भालेराव.

आर.बी.आय च्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल सहकार भारतीचे राष्ट्रीय संरक्षक श्री. सतिषजी मराठे यांचा सत्कार करताना राज्य फेडरेशनचे महासचिव डॉ. शांतीलाल सिंगी, उपकार्याध्यक्ष श्री. सुदर्शन भालेराव खजिनदार श्री. दादाराव तुपकर, श्री. सिद्धीविनायक मुळे

चौंडेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर येथे राज्य फेडरेशनचे अध्यक्ष श्री. काका कोयटे यांना सदिच्छा भेट दिली असता त्याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी त्यांचे स्वागत करताना.

सांगली जिल्हा पतसंस्था फेडरेशनच्या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन करतेवेळी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, जिल्हा उपनिबंधक श्री. करेसाहेब, जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष श्री. विवेक गुळवणी, राज्य फेडरेशनचे संचालक श्री. सागर चौगुले, श्री. शशिकांत राजोबा व इतर मान्यवर

सहकार प्रशिक्षण व संशोधन प्रशिक्षण केंद्र येथे दि. ८ व ९ डिसेंबर २०१८ रोजी झालेल्या वसुली व्यवस्थापन - प्रशिक्षण कार्यक्रमाची क्षणचित्रे -

नेटविन सिस्टीम्स ॲण्ड सॉफ्टवेअर (इं) प्रा. लि. नाशिक

मार्केटिंग ऑफीस: सी २९/५, आय टी पार्क, अंबड लिंक रोड, एम.आय.डि.सी., अंबड नाशिक-१०, फोन- ०२५३-६६५१५००/६१३
रजि. ऑफीस: १/२, प्रेस्टीज पॉईंट, वसंत मार्केट जवळ, कॅनडा कॉर्नर, नाशिक फोन: ०२५३-२५८१२०४/०५

बँका, मल्टीस्टेट व नागरी सहकारी पतसंस्थाकरीता कोअरबँकींग सॉफ्टवेअर सोल्यूशन

aceBank-CBS

नेटविन कंपनीचा संपूर्ण महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, गोवा व आंध्र प्रदेश (तेलंगणा) या ठिकाणी विस्तार झालेला असून ४५०० पेक्षा जास्त सहकारी बँका व पतसंस्था क्षेत्रातील समाधानी ग्राहक वर्ग आहे. महाराष्ट्र शासन व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडियाची अधिकृत मान्यता असलेली एकमेव कंपनी.

ए.बी.एस.
ABS Anywhere Banking System
संस्थेच्या ग्राहकांना इतर कुठल्याही ABS सक्षम संस्थेतून रक्कम जमा, नावे व हस्तांतर करण्याची नाविन्यपूर्ण सुविधा.

जलद मनी ट्रान्सफर(IMPS)
जलद मनी ट्रान्सफर
मोबाईलद्वारे जलद मनी ट्रान्सफर, २४x७ अखंडित सेवा व वेळेची आणि पैश्यांची बचत होते

तत्काल मनी (ए.टी.एम.)
ATM
संस्थेच्या ग्राहकांना देशभरातील २,३०,००० ए टी एम, पॉस मशीन, तसेच ऑनलाईन खरेदीसाठी वापरण्याची उपयुक्त सुविधा.

मोबाईल मनी कलेक्शन
बँकेच्या/संस्थेच्या अधिकृत एजंटच्या ॲन्ड्रॉईड बेस्ड मोबाईलद्वारे कोणत्याही खात्याचे कलेक्शन व नवीन खाते उघडण्याची सुविधा.

मोबाईल बँकिंग
संस्थेच्या ग्राहकांना मोबाईलद्वारे खात्यावरील बाकी शिल्लक, निधी हस्तांतरण, तत्काल मनी (ATM) फंड लोडिंग, NEFT/RTGS/IMPS इ.सुविधा

मोबाईल पेमेंट
MOBILE PAY
संस्थेच्या अधिकृत एजंटच्या मोबाईलद्वारे कोठेही पैसे देण्याची सुविधा

सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये अग्रगण्य असणाऱ्या नेटविन सिस्टीम्स ॲण्ड सॉफ्टवेअर (इं) प्रा. लि. ची स्थापना १९९६ साली झाली असून मुख्य कार्यालय नाशिक व विभागीय कार्यालय पुणे येथे आहे. ३०० पेक्षा अधिक कर्मचारी व उच्च प्रशिक्षित इंजिनिअर्स कार्यरत असून अधिक व तत्पर सेवा देण्याकरीता ऑनलाईन कॉलसेंटर सुविधा २४x७ दिवस उपलब्ध आहे.

आमच्या इतर सुविधा

- NEFT/RTGS (H2H)
- नेटपॉस
- रिचार्ज व बिल पे सुविधा
- मोबाईल मिस कॉल अलर्ट
- इंटरनेट बँकिंग
- KIOSK
- CDM

www.netwinindia.in

कस्टमर सर्व्हीस सेंटर
०२५३-२३०९२१०/११/१२/१३/१४

कस्टमर सर्व्हीस सेंटर (CBS)
०२५३-६६८५४४४

JAS-ANZ IAF ISO 9001:2008 ISO/IEC 27001:2013 | CISA certified

शाखा-
नाशिक, मालेगाव, जळगाव, अकोला, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, नांदेड, बीड, सोलापूर, अहमदनगर, शिर्डी, नारायणगाव, पुणे, कराड, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, मुंबई, पणजी (गोवा), इंदौर (म. प्र.), सुरत (गुजरात), अहमदाबाद (गुजरात) व बेळगावी (कर्नाटक)

भाषा सुलभता -
मराठी, इंग्रजी, कन्नड, गुजराती व इतर प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध.

अधिक माहितीसाठी मिस्ड्कॉल करा: ०८०३०६३६३१२ | sales@netwinindia.net | www.netwinindia.net

बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., बुलडाणा, र.नं. २६७ (मल्टीस्टेट)

(संस्थेचे कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ,गुजरात, अंदमान-निकोबार)

मुख्यकार्यालय :: सहकार सेतू, हुतात्मा गोरे पथ , बुलडाणा - ४४३ ००१ (महाराष्ट्र)

भारतातील पहिली ISO - 9001 : 2000 व SA 8000 - 2002 मानांकित

॥ संस्थेची आर्थिक स्थिती ॥

* एकुण ठेवी : ५४३३ कोटी
* एकूण कर्ज : ४५२९ कोटी
* एकुण सभासद : ७७२०००
* एकूण शाखा : ४१८
* एकूण गोदाम : ३००
* सोने तारण कर्ज वाटप : १०५० कोटी
* कार्यक्षेत्र : महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, गुजरात, अदमान निकोबार, गोवा, आंध्रप्रदेश

॥ संस्थेचे प्रकल्प ॥

* पुणे येथे सभासदांच्या पाल्यांसाठी वसतिगृह
* उच्च शिक्षण घेऊ इच्छिनाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष कर्ज योजना
* तिरुपती (आंध्रप्रदेश) येथे भक्तनिकेतन
* माहुर (जि. नांदेड) येथे भक्तनिकेतन
* बुलडाणा येथे १२५ मुलींकरीता छात्रानिकेतन सुविधा
* ३०० वेअर हाऊस (ग्रेन बँक)
* बुलडाणा गोरक्षण धाम

॥ नियोजित ॥

* जिवनसंध्या स्वर्गाश्रम व वेदविद्यालय
* ओंकारेश्वर (म.प्र.) व शिर्डी येथे धर्मशाळा

फोन नं. (०७२६२)२४२७०५, २४३७०५ www.buldanaurban.in ला भेट द्या Email : buldanaurban@rediffmail.com

वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच वैद्यकीय व्यावसायिकांसाठी कर्ज पुरवठ्याची सुविधा

बुलडाणा अर्बन चॅरिटेबल द्वारा संचालित, विदर्भातील पहील निवासी शाळा

सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय,

विद्यानगरी, चिखली रोड, बुलडाणा

वर्ग १ ली ते १२ (विज्ञान शाखा)

AQSR

ISO 9001 - 2000 Registered

वैशिष्टे

- बुलडाणा शहरापासुन ५ कि.मी.अंतरावर प्रदुषण विरहीत वातावरणात ३० एकराच्या विशालकाय परिसरामधील अनोखी शाळा
- अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज विशाल पुस्तकालय,पाठशाळा,विशाल भोजन कक्ष,इंडोअर व आऊटडोअर स्टेडीयम व सुविधायुक्त सहकार विद्या मंदिर
- पौष्टीक भोजन तथा स्वास्थ रक्षा
- शैक्षणिक भ्रमण , आश्वारोहण, गिर्यारोहण, नेमबाजी,स्विमिंग, स्केटींग, कराटे, संगीत,तलवार बाजी आणि खुप काही...
- भारतीय संस्कृतीवर आधारित एक परिपूर्ण शिक्षण, जिथे आपला पाल्य शिक्षण व नैतीक मुल्यांनी आपल्या सर्वांगीण विकासामुळे एक आदर्श नागरीक बनु शकेल
- विद्यार्थी निवास :- विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र व्यवस्था

फोन नं. (०७२६२)२४२७०५, २४३७०५

www. sahakarvidyamandir.in

॥ विनीत ॥



सौ. कोमल झंवर

अध्यक्षा,बुलडाणा अर्बन, बुलडाणा

राधेश्याम चांडक

संस्थापक अध्यक्ष,बुलडाणा अर्बन, बुलडाणा

डॉ.सुकेश झंवर

चिफ मॅनेजिंग डायरेक्टर बुलडाणा अर्बन, बुलडाणा

सहकाराची समृध्द परंपरा **बुलडाणा अर्बन**